आरबीआय / २००४ / १३६
डीसीएम (आरएमएमटी) क्र. ११८१ / ११/३७.०१/२००३-०४

एप्रिल ५, २००४

अध्यक्ष व कार्यकारी संचालक
सर्व सार्वजनिक / खाजगी बँका

प्रिय महोदय,

**नाण्यांची स्वीकृती**

आम्ही आमच्या डीसीएम (आरएमएम टी) क्र. ४०४/११.३७.०१/२००३-०४ दि. ऑक्टोबर ९, २००३ च्या पत्राचा संदर्भ देऊ इच्छितो त्या पत्रामधे आम्ही आपल्या सर्व शाखांना आम जनतेकडून सर्व किंमतीची नाणी कुठल्याही निर्बंधा शिवाय स्वीकारण्याची सूचना देण्याची विनंती केली होती. तरी ही आम्हाला अजूनही बँकांच्या शाखांनी नाणी न स्वीकारल्याच्या तक्रारी थेट व इतर मार्गांनी मिळत आहेत. अशा तक्रारामुळे लहान दुकानदार व किरकोळ सेवा पुरवणारे ही, ती नाणी स्वीकारण्यास तक्रार देत आहेत आणि सामान्य जनतेची गैरसोय होते आहे. अशा नाण्यांबद्दल नावड असल्याने व्यापारी व ग्राहक यांच्यात मोबदला / सुटे पैसे देण्याघेतल्यावरुन वाद ही होत आहेत. म्हणून आपणास पुन्हा सांगण्यात येत आहे की सर्व शाखांना सर्व दर्शनी मूल्यांची नाणी खात्यात भरण्यासाठी किंवा बदलून देण्यासाठी स्वीकारण्याची सूचना देण्यात यावी.

२) पूर्वी सूचित केल्याप्रमाणे छोट्या दर्शनी मूल्यांची नाणी वजन करुन घेणे सोयीस्कर ठरेल. परंतु रोखपाल व ग्राहकांच्या दृष्टीने, प्रत्येकी १०० नाण्यांच्या प्लास्टिक पिशव्या करणे जास्त सोपे पडेल. ग्राहकांच्या सोयीसाठी अशा पिशव्या रोखपालाजवळ ग्राहकांसाठी ठेवण्यात याव्यात. पिशव्या असल्याची सूचनाही बँकेत व बँकेबाहेर योग्य रीतीने जनतेच्या माहितीसाठी लावण्यात याव्यात. ५, १० व २० पैशांची ऍल्युमिनियम नाणी, १० पैशांची ऍल्युमिनियम ब्रॉंझ नाणी, १० पैशांची स्टीलची नाणी, २५, ५० पैसे व १ रुपयाची क्युप्रोनिकेल नाणी रद्दकरुन टांकसाळी कडे वर्ग करण्यात येणार असल्याने ग्राहकांना विनंती (आग्रह नव्हे) करण्यात यावी की अशी नाणी मूल्यानुसार व धातूनुसार वर्गीकृत करून यावीत आणि मग १०० च्या संख्येत बँकेत भरावित. असेच वर्गीकरण सध्याच्या २५, ५० पैसे व १ रुपयाची स्टीलची नाणी व क्युप्रोनिकेलची २ व ५ रुपयांच्या नाण्यांसाठी करावे. वजना मध्ये फार तफावत असल्यास नाणी मोजण्याची यंत्रे वापरावीत.

३) शाखांमधे नाणी साठवण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी ५, १० व २० पैशांची ऍल्युमिनियम नाणी, १० पैशांची ऍल्युमिनियम ब्रॉंझ व स्टीलची नाणी २५, ५० पैसे व १ रुपयाची क्युप्रोनिकेल नाणी भारत सरकारच्या मुंबई, कलकत्ता व हैदराबादच्या टांकसाळीं कडे करन्सी चेस्ट आणि स्वतःच्या वा दुसऱ्या बँकेच्या करन्सी चेस्ट आणि छोटी नाणी डेपो शाखा यांच्या तर्फे पूर्वसूचना देऊन पाठवावित. २५, ५० पैसे व रु. १ ची स्टीलची नाणी व क्युप्रोनिकेलची व रु. ५ ची नाणी मात्र पुन्हा वापरात आणावित. या नाण्यांचा साठा बँकेच्या स्वतःच्या वा दुसऱ्या बँकेच्या असल्यास त्या सर्कलच्या वितरण विभागाकडे वितरणासाठी मदत मागण्यात यावी.

४) विभागीय / आंचलीय प्रबंधकांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी शाखांना अचानक भेटी देऊन अनुसरण अहवाल मुख्य कार्यालयास द्यावा. या अहवालांची पाहणी करुन दुरुस्ती कार्यक्रम जरुरीप्रमाणे राबवावा.

५) या संदर्भात अनुसरण न केल्यास रिझर्व्ह बँकेच्या सूचनांचा अवमान केल्याचे समजले जाईल.

या पत्राची पोच द्यावी व काय कार्यवाही केली ते कळवावे

आपला विश्वासु
पी के बिश्वास
कार्यकारी संचालक

सहपत्र : डीसीएम (आरएमएमटी) क्र. / ११.३७.०१/२००३-०४

माहितीसाठी प्रत :-
१) प्रादेशिक संचालक / मुख्य महाव्यवस्थापक / महाव्यवस्थापक (प्रभारी अधिकारी) भारतीय रिझर्व्ह बँक, अहमदाबाद / बंगलोर / भोपाळ / भुवनेश्वर / चंदीगढ / चेन्नई / गुवाहाटी / हैदराबाद जयपूर / जम्मू / कानपुर / कोची / कोलकत्ता / लखनौ / मुंबई / बेलापुर, नवी मुंबई / नागपुर / नवी दिल्ली / पाटना / तिरुअनंतपुरम त्याने / तिने तातडीने नाण्यांसाठी प्लास्टिकच्या पिशव्या पुरविण्याची व नाणी स्वीकारण्याची या परिपत्रकाच्या परिच्छेद २ मध्ये दिल्याप्रमाणे व्यवस्था करावी, त्याने या नाणी घेण्याच्या व्यवस्थेसंबंधी, शाखेतील त्याच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर व कार्यालयातही सूचना प्रदर्शित करावी, वृत्तपत्रातही ही माहिती प्रसिद्ध करावी. त्याने या सूचनेचे अनुसरण वितरण विभाग व शाखांकडून करवून त्यासंबंधी खात्री करुन ध्यावी की त्याच्या कार्यालयात नाण्यांचा विना-निर्बंध स्वीकार होत आहे. म्हणजे नाणी देणारांना तक्रारीसाठी वाव राहणार नाही.

२) मुख्य महाप्रबंधक, परीक्षण विभाग, भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीय कार्यालय, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१

३) प्राचार्य, रिझर्व्ह बँक स्टाफ कॉलेज, ३५९, अन्ना सलाई, तेनामपेट, चेन्नई — ६०० ०१८

४) प्राचार्य, बँकर्स ट्रेनिंग कॉलेज, वीर सावरकर मार्ग, दादर, मुंबई — ४०० ०२८

५) प्राचार्य, कॉलेज ऑफ ऍग्रिकल्चरल बँकिंग, गणेश लिंक मार्ग, पुणे ४११ ०१६

(व्ही आर गायकवाड)
मुख्य महाव्यवस्थापक